# उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे

(डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली)

ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग, ४१६५२०

दूरध्वनी क्र. – ०२३६२–२९५२७५, २९५२७३ Email ID – cohmulde@gmail.com


जा. क्र. उविमामु/आस्था/245 /२०२३ दिनांक 10 FEB 2023

## जाहीरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथे 'ड' या संवर्गातील 'माळी' या रिक्त पदांकरीता तात्पूरत्या स्वरुपात अकरामाही तत्वावर व ठोक वेतनावर अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक २७/०२/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या कार्यालयात सादर करावयाचे आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | दरमहा एकत्रित वेतन प्रति कर्मचारी | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | माळी | २ | रू. १३,५००/– | अकरा महिने |

पदासाठी पात्रता :–

| | |
|---|---|
| माळी | अ) ९ वी पास व कृषि विद्यापीठ मान्यताप्राप्त १ वर्षाचा माळी पदाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| | ब) कृषि विद्यापीठातील माळी पदाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

**नियम व अटी खालीलप्रमाणे :–**

१) उपरोक्त पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे अशी राहील.

२) उमेदवारानी विहीत प्रपत्रामध्ये पूर्ण तपशिल भरुन अर्ज सादर करावा. लखोटयावर 'माळी' या पदासाठी अर्ज असे लिहीलेले असावे.

३) पात्र उमेदवारांना मुलाखतीला बोलावण्यात येईल.

४) मुलाखतीला येताना उमेदवारांने आपल्या शैक्षणिक अर्हता, वय आणि जातीच्या प्रमाणपत्राची मुळ प्रती सोबत आणाव्यात. मुळ प्रमाणपत्र असल्याशिवाय मुलाखत घेतली जाणार नाही.

५) मुलाखतीला उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६) निवड झालेल्या उमेदवारांनी विहीत करण्यात आलेल्या एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यात येईल.

७) निवड झालेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहीत नमुन्यात रु. १००/– च्या किमतीच्या बॉन्ड पेपरवर लिहून द्यावा लागेल.

८) उमेदवाराला प्रकल्पातील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियमित आस्थापनेसाठी दावा करता येणार नाही.

९) मुलाखतीसाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०) कार्यालयीन कामकाजाची वेळ विद्यापीठ नियमाप्रमाणे राहील. तथापि, एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण करण्सासाठी थांबावे लागेल किंवा लवकर यावे लागेल.

११) सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१२) जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहताना देण्यात येणार नाही.

१३) तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक दिलेल्या उमेदवारास डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी नोकरी मिळण्याचा कोणताही हक्क राहणार नाही

१४) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याचा हक्क राहणार नाही.

१५) उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास अथवा गैरवर्तणूक आढळल्यास तात्पुरत्या स्वरुपातील नेमणूकीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणतेही कारण न देता प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

१६) कोणतेही टपाल विलंबासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१७) कोणत्याही स्वरुपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरवले जाईल.

१८) लहान कुटुंबासाठी लहान कुंटुबाचे प्रतिज्ञापत्र नमुना ‘अ’ अर्जासोबत सादर करावे.

१९) वयाचा लाभ/फायदा घेणाऱ्या उमेदवाराने नॉनक्रिमिलेअर/जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

२०) नावामध्ये बदल असल्यास राजपत्र (गॅजेट) जोडण्यात यावे.

२१) जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२२) निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त अर्ज कोणतेही कारण न दाखवता नाकारण्याचे पूर्ण हक्क आहेत.

२३) अर्जा सोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात. जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/ १६१४/३४५/प्र. क्र. ७१/१८—अ, दिनांक ०९/०३/२०१५ अन्वये विहीत नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.

सहयोगी अधिष्ठाता,
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना रवाना.

त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यात यावी.

# अर्जाचा नमुना

| फोटो इथे लावावा |
|---|

१) जाहिरातीतील ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव : ____________________

२) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ____________________

३) सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक : ____________________
____________________

४) कायमचा पत्ता : ____________________
____________________
____________________

५) जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :

६) अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकाच्यावेळी असलेले वय :
............ वर्षे, ............. महिने, ............ दिवस

७) अर्जदाराची जात आणि प्रवर्ग : जात ...................., प्रवर्ग ...................

८) शैक्षणिक अर्हता

| अ. क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |

९) अनुभव :— ................ वर्षे ................... महिने ................... दिवस

| अ. क्र. | नियोक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | | हाताळीत असलेल्या कामाचे स्वरूप | नोकरी सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून (दिनांक) | पर्यन्त (दिनांक) | एकूण कालावधी | | | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस | | |
| १) | | | | | | | | | |

१०) इतर

मी असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नूसार अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

# प्रतिज्ञापन

## नमुना "अ" (नियम –४)

मी, श्री./श्रीमती./कुमारी ..................................................................................... श्री./श्रीमती. .......................................................................................... यांचा/ यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ............... वर्षे, राहणार ....................................................... ........................................................................ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी, ......................................................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...................... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे

ठिकाण : (अर्जदाराचे नांव व सही)

दिनांक :

# प्रपत्र—ब

## स्वयं—साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

मी, ................................................. श्री. .................................................................. .............................. यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ............... वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ........................................................ व्यवसाय ....................................... राहणार ...................................................... याद्वारे घोषित करतो/करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि/किंवा संबंधित कायदयानूसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानूसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही

दिनांक : अर्जदाराचे नांव